N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** चाळीसगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0312 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/06/2026 08:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 24/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2026
**Time From (वेळेपासून):** 16:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/06/2026 **Time (वेळ):** 07:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2026 07:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रशासकीय इमारत चाळीसगाव,चाळीसगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** चाळीसगांव
**District(State) (जिल्हा(राज्य)):** जळगाव(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a)**Name** (नाव): श्री. वाल्मीक बापु चौधरी चौधरी

(b)**Father's Name** (वडील चे नाव) : बापु चौधरी

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1965

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मौजे तरवाडे ता चाळीसगाव,चाळीसगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मौजे तरवाडे ता चाळीसगाव,चाळीसगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7774011078

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्यारेलाल विठठल महाजन महाजन | | वडील का नाम : विठठल महाजन | 1. 208,वाकीरोड,नवकार प्लाझा, जामनेर,जामनेर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7500/रू. 500 रुपये दराच्या 15 नोटा | 7,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन, जि. जळगांव, गु.र.नं. 312/2026 भ्र.प्र.का. सन 1988 चे कलम 7 प्रमाणे
1.युनिटचे नांव - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक
2.सरकारतर्फे फिर्यादी - श्रीमती नेहा तुशार सुर्यवंशी पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतीबंधक विभाग नाशिक
3. मुळ तक्रारदाराचे नांव - श्री. वाल्मीक बापु चौधरी वय 61 वर्ष, व्यवसाय शेती, रा. मौजे तरवाडे ता. चाळीसगाव, जि. जळगाव
4. आरोपीचे लोकसेवक नांव, वय, हुद्दा, नेमणुक व पत्ता - श्री. प्यारेलाल विठठ्ल महाजन, वय 53 वर्शे, वनपाल, सामाजीक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगाव ता. चाळीसगाव जि. जळगाव, रा. नवकार प्लाझा,फ्लॅट नंबर 208, वाकीरोड, जामनेर, ता.जामनेर, जि. जळगाव
5. आरोपीचे खाते, वर्ग - वनविभाग वर्ग -3
6. अप. घडला ता. वेळ - दिनांक 24/06/2026 रोजी 16.24 ते 16.41 वाजताचे दरम्यान प्रशासकीय इमारत चाळीसगाव ता चाळीसगाव जि.जळगाव
7. अपराध घडला ठिकाण - चाळीसगांव शहरातील प्रशासकीय इमारत चाळीसगाव ता चाळीसगाव जि.जळगाव
8. लाचेची मागणी - 7,500/- रुपये
9. लाच स्विकारली व हस्तगत केलेली रक्कम – 7,500/- रुपये त्यांत 500रुपये दराच्या 15 नोटा
10. थोडक्यात हकिगत - यातील तक्रारदार यांचे मौजे तरवाडे ता. चाळीसगाव शिवारातील शेतात चंदन वृक्ष लागवड व संवर्धनासाठी शासनामार्फत निधी मिळण्यासाठी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगाव येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत अर्ज केला असता त्यांचा अर्ज मंजुर होवुन त्यांचे वृक्ष लागवडी व संवर्धनासाठी प्रती वर्श 1,50,000/- रू. प्रमाणे तीन वर्शासाठी 4,50,000/- रू. मंजुर झाले होते. सदर वृक्ष लागवडीसाठी कुषल कामाचे खर्चाचे बिल सादर केले होते सदर सादर केलेल्या देयकाचे 50,000/- रक्कमेचे बिल काढुन देणेसाठी बिलाचे 15 टक्के प्रमाणे 7500/-रुपयांची लाचेची मागणी पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक 24/06/2026 रोजी 14.29 ते 14.47 वाजताचे दरम्यान करून सदर लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक नामे श्री. प्यारेलाल विठठ्ल महाजन, वय 53 वर्शे, वनपाल, सामाजीक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगाव ता. चाळीसगाव जि. जळगाव यांनी दिनांक 24/06/2026 रोजी 16.24 ते 16.41 वाजताचे सुमारास यशस्वी सापळा कारवाई दरम्यान बेकायदेशीर मार्गाने पारीतोशण म्हणुन सदर लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी सरकारचे वतीने आरोपी लोकसेवक नामे श्री. प्यारेलाल विठठ्ल महाजन, वय 53 वर्शे, वनपाल, सामाजीक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगाव ता. चाळीसगाव जि. जळगाव, रा. नवकार प्लाझा,फ्लॅट नंबर 208, वाकीरोड, जामनेर, ता.जामनेर, जि. जळगाव यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा आहे तसेच सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Amitkumar rohidas Manel(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Amitkumar rohidas I
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

<u>फिर्याद</u>

चाळीसगांव शहर पोलीस ठाणे, जि. जळगांव
दिनांक:– २५/०६/२०२६.

माझे नाव नेहा तुषार सुर्यवंशी वय ३६ वर्ष, व्यवसाय: नोकरी (पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक), राहणार: बालाजी रो–हाऊस नं. १, समर्थ नगर, पेठ मखमलाबाद लिंकरोड, ता.जि. नाशिक, मो.न. ७७७४०११०७८.

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहून सरकार तर्फे फिर्याद देते की, मी पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असुन मागील अकरा महिण्यापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र कार्यालय नाशिक येथे नेमणुकीस आहे. दिनांक १९/०६/२०२६ रोजी ला.प्र.वि. नाशिक कार्यालयात कर्तव्यावर असतांना वरिष्ठांकडुन मिळालेल्या तोंडी आदेशान्व्ये तक्रारदार श्री. वाल्मिक बापू चौधरी यांना त्यांचे मोबाईल फोनद्वारे संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, ''एक लोकसेवक त्यांच्याकडे लाचेची मागणी करीत असुन त्यांनी भेटण्यासाठी दिनांक २४/०६/२०२६ रोजी बोलाविले आहे. तरी त्या अनुषंगाने तक्रारदार श्री. चौधरी यांनी चाळीसगांव येथे दिनांक २४/०६/२०२६ रोजी १४:०० वाजे पावेतो भेटण्यासाठी या, मी तेथेच आपणांस माझी तक्रार लिहुन देतो'' असे सांगितले. त्यानंतर आम्ही दिनांक २३/०६/२०२६ रोजी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना दोन कर्मचारी पंच म्हणुन मिळणेकामी लेखी पत्र देवुन सदर कर्मचारी यांना दिनांक २४/०६/२०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथे हजर ठेवणेबाबत कळविले.

चाळीसगांव शहर पो.ठा.
जि.जळगांव गु.र.क्र. 312/२०२६
लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे
दि. २५/०६/२०२६
07:44 वा.
स्टे.डा.नों.क्र. /२०२६

दाखल अंमलदार
[signature]
पो.ठा अमलदार
चाळीसगांव शहर पो स्टे
जि जळगांव

त्यानंतर दिनांक २४/०६/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता आम्ही, सापळा पथकातील पोहवा/विनोद चौधरी, पोशि/गांगोडे व पोशि/योगेश शिंदे असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथे आमचे कक्षात हजर असतांना सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक येथील श्री. संदिप सुदाम निमसे, सहायक आरेखक, राहणार: मु.पो. विंचुरी गवळी, महादेव मंदिरा शेजारी, ता.जि. नाशिक, व श्री.रोहित अशोक धोंगडे, शिपाई, राहणार: मु. पेगलवाडी, पोस्ट अंजनेरी, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक, असे कर्मचारी आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी आम्ही त्यांचा परिचय करून घेवुन त्यांना आमचा तसेच सापळा पथकातील सदस्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना लाचेच्या सापळयात पंच साक्षीदार म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? अशी विचारणा केली, त्यावर त्यांनी होय म्हणुन संमती दिली. त्यानंतर आम्ही पंचांना व सापळा पथकातील सदस्यांना तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी यांची चाळीसगांव येथे भेट घेवुन त्यांची तक्रार लिहुन घेवुन पुढील कार्यवाही करणे आहे, असे सांगितले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य असे शासकीय वाहन कमांक **MH 15 JS 3092** मध्ये सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले लॅपटॉप, प्रिंटर, व्हॉईस रेकॉर्डर, ॲन्थ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा, काळा कपडा व इतर आवश्यक साहित्य घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथुन साधारण १०:३० वाजता निघुन तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी यांनी सांगितलेल्या चाळीसगांव येथील कोतकर महाविद्यालय (मोठे कॉलेज) चे कंपाऊंड लगत करगांव रस्त्याचे कडेला मोकळया जागेत १३:४५ पोहचलो असता तेव्हाच तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी हे भेटले असता त्यांना आमची तसेच शासकीय पंच व सापळा पथकाची आपआपसात ओळख परिचय करून देवुन तक्रारदार यांना त्याचे संपुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव वाल्मिक बापू चौधरी, वय ६१ वर्षे, व्यवसाय: शेती, राहणार मु.पो. तरवाडे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव मोबाईल क. ९८५०६३१७१८ असे सांगुण पंच साक्षिदार यांचे समक्ष त्यांचे तक्रारीचा आशय तोंडी सांगुण सदर तक्रार मराठी भाषेत स्वत: लिहुन दिली ती पुढिल प्रमाणे,''समक्ष हजर राहुन तकार लिहुन देतो की, मी वरील नमुद पत्त्यावर राहत असुन शेती व्यवसाय करतो. माझे नावे मौजे तरवाडे शिवारात शेत गट नं. ३०१ क्षेत्र १.९० हेक्टर शेत जमीन आहे. त्या शेत जमीनी पैकी ०.८० हेक्टर शेत जमीनीवर सन २०२५ मध्ये चंदन वृक्षांची लागवड केली होती. त्या वृक्ष लागवड व संवर्धनासाठी शासनामार्फत निधी मिळण्यासाठी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, चाळीसगांव येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी अर्ज केला असता मला शासना मार्फत माझे अर्जास मंजुरी प्राप्त झाली होती. त्या योजने अंतर्गत प्रती वर्ष १,५०,०००/– रू. प्रमाणे तीन वर्षात ४,५०,०००/– प्राप्त होणार आहेत. आम्ही सादर केलेल्या नमुद चंदन वृक्ष लागवड व संवर्धन प्रकारात लागवडीसाठी आलेल्या खर्च व संवर्धनसाठी आलेली मजुरीचे बिल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव कार्यालयात सादर केले होते. सदर बिलाबाबत दिनांक १९/०६/२०२६ रोजी श्री. महाजन यांना सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव येथे भेट घेतली असता त्यांनी सदर लागवडीचे कुशल कामाच्या खर्चाच्या बिलाचे देयकाचे ५०,०००/– रू. मंजुर झालेल्या रक्कमेचे बिल माझे बॅंक खात्यावर काढुन देण्याचे मोबदल्यात मंजुर झालेल्या बिलाचे १५ टक्के प्रमाणे ७,५००/– रू. लाचेची मागणी केली होती. परंतु मला कोणालाही काहीएक लाच दयावयाची नव्हती, म्हणुन मी सदरबाबत माझा मुलगा ऋषिकेश चौधरी यास

सांगितले असता त्याने माझे मोबाईल फोनद्वारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे दिनांक १९/०६/२०२६ रोजी संपर्क करून तक्रार केली असता आम्हाला पोलीस निरीक्षक श्रीमती नेहा सुर्यवंशी मॅडम यांचा संपर्क क्रमांक देवुन त्या आम्हाला संपर्क करतील, असे सांगितले. त्यानंतर आपण मला माझे नमुद मोबाईल फोनवर संपर्क केला असता तेव्हा मी आपणास वरीलप्रमाणे हकिगत सांगुन कळविले की, मला श्री. महाजन यांनी दिनांक २४/०६/२०२६ रोजी भेटीसाठी बोलाविले असुन तेव्हा ते माझेकडे लाच मागण्याची दाट शक्यता आहे. तरी आपण मला दिनांक २४/०६/२०२६ रोजी चाळीसगांव येथे भेटल्यावर तक्रार लिहुन देणार असलेबाबत सांगितले होते.

तरी मी आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझी वरील प्रमाणे तक्रार लिहुन देत असुन श्री. महाजन यांना त्यांचे सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव कार्यालय येथे भेटण्यास जाणार आहे. तेव्हा श्री. महाजन यांनी माझे मंजुर देयकाचे बिल बॅक खातेवर टाकण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर लाचेची कारवाई होणेस विनंती आहे. तसेच श्री. महाजन व माझेत यापुर्वी कोणतेही भांडण–तंटा नसुन कोणताही आर्थिक उसनवारीचा व्यवहार झालेला नाही.

माझी वरील तक्रार मी स्वःत लिहुन दिलेली वाचुन पाहिली असता ती बरोबर व खरी आहे.''वगैरे मजकुरची तक्रार देवुन सदर तक्रारीवर तक्रारदार यांनी सही केल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सही केली होती.

त्यानंतर तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने सामाजिक वनीकरण, चाळीसगांव येथील कर्मचारी श्री. महाजन हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता सामाजिक वनीकरण, चाळीसगांव येथील कर्मचारी श्री. महाजन यांची भेट घेण्याकामी सामाजिक वनीकरण, चाळीसगांव कार्यालय येथे पाठविणे असल्याने आम्ही स्वतः तक्रारदार व नमुद पंचांना व्हॉईस रेकॉर्डरची माहिती करून दिली. तसेच तक्रारदार व पंचांचे समक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सॅनडिस्क कंपनीचे पॅकिंग मधील नविन मेमरी कार्ड टाकुन सदर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसल्याची पंचांची व तक्रारदार यांची खात्री करुन देवुन सदर व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टाचे आत बनियनला टाचन पिनने पाकिट लावुन त्यात ठेवुन दिले. त्यानंतर तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी यांचे सोबत पंच नं. १ श्री. संदिप निमसे यांना पाठवायचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच नं. १ श्री. संदिप निमसे यांना सामाजिक वनीकरण चाळीसगांव येथे तेथील कर्मचारी श्री. महाजन यांचेकडे तक्रारीप्रमाणे लाचेच्या आक्षेपांची पडताळणी करणेकामी १४:२९ वाजताचे सुमारास रवाना केले असता तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी व पंच नं. १ श्री. संदिप निमसे हे सामाजिक वनीकरण चाळीसगांव येथे तेथील कर्मचारी श्री. महाजन यांची भेट घेवुन साधारण १८ मिनिटात परत आले असता तक्रारदार व सामाजिक वनीकरण चाळीसगांव येथील कर्मचारी श्री. महाजन यांचेत झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले पंच साक्षिदार यांचे समक्ष ऐकले असता त्यात श्री. महाजन हे तक्रारदार यांना म्हणतात की, ''मी पैसे कमी आणले असते तर, एक मस्टर हिशोब लावुन घ्या, एक मस्टर माझेकडे बाकि हे अजुन ते पुर्ण होवु दया, मंग आपण त्याचे पैसे काढु तसेच आता मला कुशलचे देवुन टाका'' त्यावर तक्रारदार म्हणतात की,''कुशलचे किती देवु'' तेव्हा श्री. महाजन हे म्हणतात की, ''७,३००/– देवुन टाका, ५०,०००/– चे आहे ते'' त्यानंतर तक्रारदार पुन्हा विचारतात,''५० चे का ते?'' पुन्हा तक्रारदार व श्री. महाजन यांचेत कुशल व अकुशल कामासंदर्भात चर्चा होते. त्यानंतर श्री. महाजन हे तक्रारदार यांना म्हणतात की,''आपले साडेचार लाखाचे बिल तीन वर्षात दिड–दिड–दिड लाख'' तेव्हा तक्रारदार म्हणतात की,''पहिल्या वर्षाला वाढीव मिळतात ना!'' त्यावर श्री. महाजन म्हणतात की,''ते बाकीचे आपण पेड केले होते, तुम्ही मला पैसे दिले होते सप्टेंबर मध्ये छत्तीसशे ३३ प्रमाणे ३२,०००/–रू, १ एप्रिलला २,५००/–रू., ३० मे ला २,५००/–रू. अण ५००/–रू. आता एवढे दिले होते. बाकी राहिले ते कशाचे कुशलचे'' त्यावर तक्रारदार म्हणतात,''कुशलचे का?'' तेव्हा श्री. महाजन म्हणता,''कुशलचे ५०,००० चे बिल हे ना! मग १५ टक्के म्हणजे पंधरा पाचे पंच्यातशे, सात हजार पाचशे तुम्हाला सांगतो कुशलचे दया! शेवटचे मस्टर हेना हे!'' इत्यादी प्रमाणे पडताळणी कारवाईत संभाषण होते. सदर संभाषणावरून आमची, पंच साक्षिदार व सापळा पथकाची खात्री झाली की, सामाजिक वनीकरण चाळीसगांव येथील कर्मचारी श्री. महाजन यांनी तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी यांचेकडे त्यांनी त्यांचे शेतात चंदन वृक्षाचे लागडी व संवर्धनासाठी शासनाचे महातमा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या कुशल खर्चाच्या बिलाचे देयकाची ५०,०००/– रक्कम तक्रारदार यांचे बॅक खात्यात जमा करण्यासाठी मंजुर रक्कमेच्या १५ % टक्के म्हणजे ७,५००/– रू. मोबदला म्हणुन लाचेच्या रक्कमेची मागणी केली आहे. सदर पडताळणी कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

सदर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने लागलीच सापळा कारवाई योजण्याचे सर्वानुमते ठरल्याने सापळा पुर्व कारवाई दरम्यान मागणी केलेली लाचेची रक्कम तक्रारदार यांना हजर करण्यास सांगितली असता त्यांनी त्यांचे

बचतीचे ५००/— रू. दराच्या १५ भारतीय चलनी नोटा पंच साक्षिदार यांचेसमक्ष हजर केल्या. सदर हजर केलेली लाचेची रक्कम लाच म्हणुन दयावयची असल्याने लाचेच्या सापळयात चलनी नोटांना अ‍ॅन्थ्रासिन पावडर कशी लावली जाते, याबाबत आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना माहीती देवून लाचेच्या रक्कमेस अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावुन सदर रक्कम तक्रारदार यांच्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. १ श्री. संदिप निमसे यांना श्री. महाजन यांचे भेटीसाठी सामाजिक वनीकरण चाळीसगांव कार्यालय येथे रवाना करावयाचे असल्याने योग्यत्या सुचना देवुन आम्ही स्वत: तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डरची माहिती देवुन त्यांचे समक्ष पडताळणी कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले व्हॉईस रेकॉर्डर न घेता दुसरे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सॅनडिस्क कंपनीचे पॅकिंग मधील मेमरीकार्ड टाकुन सदर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसल्याची तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/अनिल गांगोडे यांनी तक्रारदार यांना त्यांचे शर्टचे आतिल बनियनला बंद व्हॉईस रेकॉर्डर लावुन चालु करून दिले. ती वेळ १६:२४ वाजेची होती.

त्यानंतर आम्ही, पंच नं. २ श्री. रोहित धोंगडे व सापळा पथक असे तक्रारदार श्री. वाल्मिक व पंच नं. १ श्री. संदिप निमसे यांचे पाठोपाठ प्रशासकीय इमारत येथील सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव कार्यालयाचे बाहेर स्वत:चे अस्तित्व लपवुन लोकांचे गर्दीत उभे राहुन सापळा कारवाई योजिली. त्यानंतर तक्रारदार श्री. वाल्मिक चौधरी व श्री. महाजन हे सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव कार्यालयाचे बाहेर येवुन त्याच माळयावरील पाणी पिण्याच्या ठिकाणी आले असता श्री. महाजन यांचेसमक्ष असतांना लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. ती वेळ साधारण १६:३९ वाजेची होती. तेव्हा आम्ही व सापळा पथक असे श्री. महाजन यांना ताब्यात घेण्यासाठी त्यांचे जवळ जाणार त्या अगोदरच श्री. महाजन हे तक्रारदार यांना घेवुन त्यांचे कार्यालयात गेले. तेव्हा आम्ही व सापळा पथक तसेच पंच साक्षिदार असे सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव कार्यालयाचे बाहेर उभे असतांना तक्रारदार श्री. चौधरी यांनी पुन्हा लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला असता, आम्ही, पंच नं. २ श्री. धोंगडे व सापळा पथक असे कार्यालयाचे आत जावुन श्री. महाजन यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही श्री. महाजन यांना आमची, पंच साक्षिदार व सापळा पथकाची ओळख करून देवुन त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव प्यारेलाल विठ्ठल महाजन, वय ५३ वर्षे, व्यवसाय: नोकरी (पद: वनपाल, नेमणुक—सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, चाळीसगांव, जि.जळगांव) राहणार: मु.पो.ता.जामनेर, वाकिरोड, जि.जळगांव, मोबाईल नं. ८८०६०६०७४४ असे सांगितले. त्यानंतर आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेवुन पुढिल सापळा कारवाई शासकीय विश्रामगृह, चाळीसगांव येथे केली असुन सदर कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेला मुद्देमालाबाबत सविस्तर माहिती सदर करण्यात आलेल्या कारवाई बाबतचा पडताळणी, सापळा पुर्व व यशस्वी सापळा कारवाई पंचनाम्यात नमुद करण्यात आले आहे.

तरी यातील तक्रारदार श्री. वाल्मिक बापू चौधरी यांनी त्यांचे मौजे तरवाडे शिवारातील शेतगट नं. ३०१ चे एकुण क्षेत्र १.९० हेक्टर पैकी ०.८० हेक्टर शेत जमीनीवर चंदन वृक्षाची लागवड व संवर्धनासाठी शासनाचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या कुशल खर्चाच्या बिलाचे देयकाची रू. ५०,०००/— रक्कम तक्रारदार यांचे बॅक खात्यात जमा करण्यासाठी मंजुर रक्कमेच्या १५ % टक्के प्रमाणे रू. ७,५००/— रक्कम मोबदला, म्हणुन प्यारेलाल विठ्ठल महाजन, वय ५३ वर्षे, व्यवसाय: नोकरी (पद: वनपाल, नेमणुक सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, चाळीसगांव,जि. जळगांव) राहणार: मु.पो.ता. जामनेर, वाकिरोड, जि. जळगांव यांनी पदाचा गैरवापर करून कायदेशीर परिश्रमाखेरीज दिनांक २४/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक २४/०६/२०२६ रोजी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चाळीसगांव येथील कार्यालयात यशस्वी सापळा कारवाई दरम्यान स्विकारतांना रंगेहात पकडले, म्हणुन माझी प्यारेलाल विठ्ठल महाजन वय ५३ वर्षे, व्यवसाय: नोकरी (पद: वनपाल, नेमणुक—सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, चाळीसगांव, जि.जळगांव) यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद वाचुन पाहिली असता ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली.
दि. २५/०६/२०२६.

समक्ष,

पो. ठा अमलदार
चाळीसगांव शहर पो. स्टे
जि जळगांव